Golden Research Thoughts ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-10 | April-2015 Available online at www.aygrt.isrj.org

भारतातील केळी पिकाखालील जमीनीचे क्षेत्रफळ, उत्पादन व उत्पादकता : एक तौलनिक अध्ययन

बी एल बाविस्कर
प्रा.अर्थशास्त्र विभाग प्रमुख , गि.द.महाजन कला, श्री. के.रा.नवलखा वाणिज्य आणि मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविदयालय,जामनेर जि.जळगांव.

Authors Short Profile

BL Baviskar is working as an Associate Professor and Head of Department at G. D. Mahajan Art in Mr. A . Resident. Navalakha Commerce and Science Mahavidayalaya Manoharasetha Dharivala , Jamner Dist. Jalgaon. He Has Completed M.A. and M.Phil. He Has Professional Experience 23 Years and Research Experience 5 Years.

सारांश :

ग्रामिण विकासात शेती क्षेत्राचे महत्व अनन्य साधारण आहे. शेती मालाच्या उत्पादनात स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या काळात लक्षणीय वाढ झालेली आहे . भारतीय शेतकरी पारंपारिक पिकांच्या तुलनेत फलोत्पादनाला रोख पिकाच्या उद्देशाने प्राधान्य देतो. जगातील एकूण फलोत्पादनापैकी ११ टक्के फलोत्पादन भारतात होते. फलोत्पादनामध्ये भारत जगातील दुस-या क्रमांकाचा मुख्य देश आहे. भारतातील अनेक फळांना जागतिक स्तरावर मोठी मागणी आहे. जगामध्ये केळी एक महत्वाचे पीक आहे. जागतिक स्तरावर केळी चौथ्या क्रमांकाचे अन्न असून तांदुळ, गहू आणि मका या नंतर केळी पीकाचा क्रमांक लागतो. केळी पौष्टिक फळ असून केळी पासून शरीराला लागणारी बहुतेक जीवनसत्वे आणि खनिजे प्राप्त होतात. केळी उत्पादनात जगात भारताचा पहिला क्रमांक असून भारतामध्ये तमिळनाडू , महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, आसाम आणि मध्यप्रदेश या राज्यात केळीची लागवड मोठया प्रमाणात केली जाते. केळी फळाला धार्मिक महत्व असून केळी बारमाही उपलब्ध असणारे फळ आहे. केळी आरोग्यवर्धक फळ असून सर्वांना आवडणारे व आर्थिकदृष्टया परवडणारे फळ आहे.

प्रस्तावना

जगात १३० पेक्षा जास्त देशात केळीची लागवड केली जाते. त्यामध्ये सर्वाधिक केळीची लागवड भारतामध्ये ५ लाख ६५ हजार हेक्टर्स वर केली जाते. जगात □ळीच्या उत्पादकतेत केवळ ४२ हजार हेक्टर्स क्षेत्रफळावर लागवड करीत असलेला कोस्टारिका हा लहानसा देश आघाडीवर आहे. कोस्टारिका राष्ट्राची केळीची प्रती हेक्टरी उत्पादकता ५२.५टन असून भारताची प्रती हेक्टरी उत्पादकता ३४टन एवढी आहे. जागतिक केळी उत्पादनात भारत (१९ दशलक्ष मेट्रिक टन) अग्रस्थानी असून ब्राझील(६.५८ दशलक्ष मेट्रिक टन) द्वितीय स्थानावर आहे तर चीन (६.२५ दशलक्ष मेट्रिक टन) तृतीय स्थानावर आहे. भारतामध्ये केळी उत्पादक राज्यांमध्ये सर्वाधिक (९५हजार हेक्टर्स) क्षेत्रावर केळीची लागवड करणारा तमिळनाडू पहिल्या क्रमांकावर आहे तर महाराष्ट्र राज्य (७२ हजार हेक्टर्स) दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांचा क्रमांक लागतो. विविध घटक राज्यांच्या केळी उत्पादकतेचा आढावा घेतला असता महाराष्ट्र राज्य सरासरी प्रती हेक्टरी उत्पादकतेत देशात अग्रस्थानी आहे. महाराष्ट्र राज्याला केळीच्या संदर्भात मानाचे स्थान मिळवून देण्यात जळगांव जिल्हयाचा सिंहाचा वाटा आहे.

अभ्यास विषयाची उद्दिष्टे

१) भारतातील केळी लागवड क्षेत्र,उत्पादन व उत्पादकतेचे तौलनिक अध्ययन करणे.

२) महाराष्ट्र राज्य व जळगांव जिल्हयातील केळी लागवड क्षेत्राचे व उत्पादनाचे तौलनिक अध्ययन करणे.

३) जळगांव जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेतील केळीचे स्थान व महत्व अभ्यासणे.

४) □ळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये व्यापारी दृष्टीकोन रुजविणे.

५) □ळी पिकाच्या निर्यात संधींचा आढावा घेणे.

६) संशोधन काळात केळी लागवड क्षेत्र व उत्पादनात झालेल्या बदलांचे अध्ययन करणे.

अध्ययनाचे महत्व

फळांमध्ये □ळी हे महत्वाचे फळ असून जळगांव जिल्हयासाठी तो कल्पवृक्ष आहे . केळीच्या घडापासून खोड, पानापर्यंत प्रत्येक अवयवावर प्रक्रीया □रुन मूल्यवर्धित उत्पादनापासून अधिक आर्थिक लाभ मिळू शकतो. त्यामुळे देशातील केळी उत्पादकांनी व्यापारी तत्वावर केळी पिकाची लागवड करुन केळी प्रक्रिया उद्योगावर भर देण्याची गरज आहे. केळीची स्थानिक तसेच देशांतर्गत गरज पूर्ण करुन केळीच्या निर्यातीला मोठी संधी आहे. केळी निर्यातीसाठी उत्पादन खर्च मर्यादित ठेवून गुणवत्तापूर्ण केळी उत्पादित करणे आवश्यक आहे. केळीला देशातील निरनिराळया बाजार पेठेत प्रचंड मागणी आहे. दिल्ली, चेन्नई, कोलकता, हैदराबाद, लुधियाना, जोधपूर, आग्रा, रतलाम वगैरे महारानगरात केळीला दैनंदिन मोठी मागणी आहे. देशात केळीची सर्वात मोठी बाजारपेठ नवी दिल्ली येथील आझादपूर मंडी असून ही आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते. या बाजारपेठेत जळगांव जिल्हयातील केळीला सर्वाधिक मागणी असते. याच बाजार पेठेतून निरनिराळया देशात □ळी निर्यात केली जाते. लागवड आणि उत्पादनात अग्रस्थानी असलेल्या भारताचा केळी निर्यातीतील वाटा केवळ ०.०८% एवढाच आहे. केळी पिकामुळे अनेक लोकांना रोजगार संधी उपलब्ध झालेल्या आहेत. भारतातून केळीच्या निर्यातीला खूप संधी आहेत. केळी पिकाच्या निर्यातीसाठी कुवैत, सौदी अरेबिया, कतार, बहरिन, सिंगापूर, नेपाळ, श्रीलंका, मलेशिया त्याचप्रमाणे युरोपिय बाजारपेठा उपलब्ध आहेत. भारतामध्ये एकूण २८ केळी बाजारपेठांपैकी मुंबई, दिल्ली, कोलकता, हैदराबाद, बैंगलोर, म्हैसूर, उदयपूर या प्रमुख बाजारपेठा आहेत. जागतिक घडामोडीमध्ये आणि

दिवसेंदिवस तीव्र होत जाणाऱ्या स्पर्धेमध्ये शेतकऱ्यांनी पिकविलेल्या केळीची गुणवत्ता वाढवून जागतिक बाजारपेठेमध्ये नियातीच्या संधी निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन दुय्यम साधन सामग्रीवर आधारीत आहे. दुय्यम साधन सामग्री मध्ये महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, कृषी सांख्यिकीय विषयक माहिती, नाफेड व्यावसायिक फलोत्पादन कॉंटिनेन्टेल प्रकाशन पुणे, योजना विशेषांक, ॲग्रोवन आणि कृषिपणन मित्र या स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी २००१ ते २००८ हा कालखंड विचारात घेण्यात आला आहे.

□ळी उत्पादनात भारताचा जगात प्रथम क्रमांक असून भारतामध्ये तामिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, आसाम आणि मध्यप्रदेश या घटक राज्यांमध्ये केळी पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते.

तक्ता क्र. -१
भारतातील केळीच्या लागवडी खालील क्षेत्रफळ, उत्पादन आणि उत्पादकता

अ.क्र.	स-न	□त्रफळ (हजार हेक्टर)	उत्पादन (हजार मे. टन)	उत्पादकता (मे. टन /हेक्टरी)
१	१९९१-९२	३८३.९	७७९०.००	२०.३
२	२००१-०२	४६६.२	१४२०९.०९	३०.५
३	२००२-०३	४७५.३	१३३०४.०४	२८.०
४	२००३-०४	४९८.६	१३८५६.०६	२७.८
५	२००४-०५	५८९.६	१६७४४.०५	२८.४
६	२००५-०६	५६९.५	१८८८७.०८	३३.२
७	२००६-०७	६०४.२	२०९९७.०८	३४.८
८	२००७-०८	६४६.९	२३२०४.०८	३५.९

स्त्रोत : अपेडा-२००९

भारतामध्ये २००७-०८ मध्ये केळी पिका खाली एकूण ३४६.९ हजार हेक्टर क्षेत्र असून त्यापासून केळी पिकाचे २३२०४.८ हजार मे. टन उत्पादन झाले. त्यापैकी २६.४% क्षेत्रफळ तामिळनाडू व त्या खालोखाल २१.४% क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याचे होते. तर गुजरात १३.६% , आंध्रप्रदेश ९.७% , बिहार ५.७% , पश्चिम बंगाल ३.८% , मध्यप्रदेश ३.४% , आसाम २.६% , □रळ २.१% तर इतर राज्ये ४.७% क्षेत्रफळावर केळी पिकाची लागवड करण्यात आली होती.

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, भारतातील विविध राज्यांमध्ये सर्वाधिक क्षेत्रफळावर केळीची लागवड करणारे तामिळनाडू राज्य प्रथम क्रमांकावर आहे.

देशात सर्वाधिक प्रतिहेक्टरी उत्पादन व उत्पादकता लक्षात घेतल्यास महाराष्ट्र राज्याचे उत्पादन (६२ मे.टन / हे.) सर्वाधिक होते. तर त्या खालोखाल गुजरात (५४.८ मे.टन / हे.), तामिळनाडू (५३.६ मे.टन / हे.), मध्यप्रदेश (५१.९ मे.टन / हे.), बिहार (४३.६ मे.टन / हे.), आंध्रप्रदेश (३०.०१ मे.टन / हे.), कर्नाटक (२५.३ मे.टन / हे.), पश्चिम बंगाल (२३.०९ मे.टन / हे.), आसाम (१३.८ मे.टन / हे.) या राज्यांचे उत्पादन होते. त्याचप्रमाणे भारतात सर्वाधिक प्रतिहेक्टरी उत्पादन व उतपादकतेत महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते.

महाराष्ट्र राज्य व जळगांव जिल्हयातील केळी पिकाच्या लागवडी खालील क्षेत्रफळ -

आर्थिक सुधारणांचा महाराष्ट्र राज्यातील शेती क्षेत्रावर मोठा परिणाम झाल्याचे आढळून येते. राज्यातील परंपरागत पध्दतीने शेती करणारा शेतकरी वर्ग अलिकडील काळात आधुनिक शेतीकडे वळला आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे शेतीच्या उत्पादकतेत वाढ करुन केळी मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळवून देणे हे आहे. देशात फलोत्पादनात महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक आहे. एकूण फलोत्पादनामध्ये राज्याचा वाटा १४% आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी २४% क्षेत्रफळावर फलोत्पादन केले जाते. परंतू केळी उत्पादनात महाराष्ट्र राज्य अग्र क्रमांकावर आहे. शेतीच्या परंपरागत स्वरुपात बदल घडवून आणून शेती क्षेत्रात आधुनिकीकरणाचा स्विकार करुन शेतीला व्यावसायिक स्वरुप देणे आवश्यक आहे. अलिकडील काळात राज्याच्या पिक रचनेमध्ये होत असलेल्या बदलांचा वेग वाढविणे आवश्यक आहे. याचा परिणाम म्हणून फळे व भाजीपाला पिकांच्या उत्पादनात झालेली वाढ ही पिक रचनेत होत असलेल्या बदलाचे द्योतक आहे. असे असले तरी २००१ ते २००८ या काळात केळीच्या उत्पादनात महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते.

जळगांव जिल्हयाच्या सर्व समावेशक विकास प्रक्रीयेत शेती क्षेत्राला महत्वपूर्ण स्थान आहे. आर्थिक सुधारणांचा जिल्हयातील शेती □त्रावरही परि□ाम झाल्याचे दिसून येते. जिल्हयातील परंपरागत पध्दतीने शेती करणारा शेतकरी आधुनिक शेतीकडे वळला आहे. शेती उदरनिर्वाचे साधन राहीले नसून तो व्यवसाय बनला आहे. शेती करण्याची पध्दती परंपरागत असली तरी आर्थिक सुधारणा काळात माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नवनवीन प्रयोग शेतीत करुन लागवडी खालील क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सुधारणा काळात जिल्हयातील पिक रचनेतही बदल झाला असून शेतकरी अन्नधान्याच्या पिकाकडून नगदी पिकांकडे वळला आहे. जिल्हयातील फळे व भाजीपाला उत्पादनात झालेली वाढ पिक रचनेतील बदलाचे द्योतक आहे. पिक रचनेतील बदल फळे व भाजीपाला पिकांखालील क्षेत्र आणि उत्पादन यात होत असलेली वाढ ही जिल्हयाच्या प्रगतीची नांदी ठरावी. जळगांव जिल्हयात घेतल्या जाणाऱ्या विविध फळ पिकांमध्ये केळी हे महत्वाचे नगदी पिक आहे. ही बाब जिल्हयातील केळी लागवडीखालील क्षेत्र व उत्पादनावरुन लक्षात येते.

जळगांव जिल्हयातील केळी उत्पादकांची पिढयान् पिढयांची मेहनत, अनुभव आणि निरिक्षणातून शेतकरी केळीचे भरघोस उत्पादन घेत आहेत. त्यामुळे जळगांव जिल्हा केळीचे आगार म्हणून राज्यातच नव्हे तर देशात प्रसिध्द आहे. त्यामुळे जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेत केळीला असाधारण महत्व आहे. अनुकूल हवामान, जमीन, पाणी, यामुळे केळी लागवडीला जिल्हयात भरपूर वाव आहे. केळी उत्पादनामुळे जळगांव जिल्हयाची ओळख ‘ बनाना सिटी ’ अशी आहे. जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ‘ □ळी ’ हे महत्वाचे फळपिक म्हणून ओळखले जाते. कारण त्यांचे संपूर्ण अर्थकारण केळी उत्पादन व केळीला मिळणाऱ्या किंमतीवर अवलंबून आहे. जिल्हयातील केळी व्यवसाय अनेक लोकांच्या जीवन निर्वाहाचा मुख्य आधार ठरलेला आहे. केळी व्यवसायात कोटयावधी रुपयांची आर्थिक उलाढाल होते. जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या केळी उत्पादनाला मात्र अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. जागतिकीकरणामुळे निर्मा□ झालेल्या जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी केळी खालील क्षेत्र वाढत असतांना कमी खर्चात दर्जेदार उत्पादन करणे आणि प्रतिहेक्टरी उत्पादन वाढविण्याचे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर जळगांव जिल्हयातील केळी पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता यांचा अभ्यास करणे हे प्रस्तुत शोध निबंधाचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत जळगांव जिल्हयात सिंचना खालील क्षेत्रफळाचे प्रमाण मोठे आहे . जळगांव जिल्हयात सिंचनाचे प्रमाण अधिक असून सुध्दा पिकांची घनता कमी आढळते. कारण जिल्हयाचा बराचसा भाग डोंगराळ असून त्या भागात लागवडीयोग्य जमिनीचे प्रमाण कमी आढळते. ज्या भागात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत त्या भागात केळी सारखे बारमाही पीक मोठया प्रमाणावर घेतले जाते. जळगांव जिल्हयातील केळी लागवडीखालील क्षेत्राची तुलना महाराष्ट्र राज्याशी करणे समर्पक ठरेल.

तक्ता क्र. -२

महाराष्ट्र राज्य व जळगांव जिल्हयातील केळी पिकाखालील क्षेत्र

(□त्र ‘ ०० ’ हेक्टर मध्ये)

अ.क्र.	वर्ष	महाराष्ट्र राज्य	□त्राशी प्रमा□	जळगांव जिल्हा	□त्राशी प्रमा□(%)
१	१९९५-९६	३८६	०.२	२२३	२.२ (५७.८)
२	१९९६-९७	४७८	---	२२८	४७.७
३	१९९७-९८	५३२	---	२६२	४९.०२
४	१९९८-९९	५८७	०.३	२७८	४७.०३
५	१९९९-००	६१३	०.३	३५५	५७.९०
६	२०००-०१	६६७	०.३	४१५	६२.०२
७	२००१-०२	५९७	०.३	३४४	५७.६०
८	२००२-०३	५७४	०.३	३४४	५९.०९
९	२००३-०४	५७४	०.३	३५९	६२.०५
१०	२००४-०५	५३७	०.२	३२१	५९.०८

□ृषी सांख्यिकी विषयक माहिती महाराष्ट्र राज्य-२००६ भा□-२

(कंसातील आकडे एकूण लागवडी खालील क्षेत्राशी असलेले प्रमाण दर्शवितात)

तक्ता क.३ मध्ये महाराष्ट्र राज्य व जळगांव जिल्हयातील केळी पीका खालील क्षेत्र दर्शविलेले आहे. १९९५.९६ मध्ये जिल्हयातील २.२% तर राज्यातील ०.२% क्षेत्र केळी पिकाच्या लावगडी खाली होते. म्हणजेच राज्यातील ५७.८% क्षेत्रफळ एकटया जळगांव जिल्हयात होते. तर २००३-०४ मध्ये वाढ होवून ते ६२.०५% एवढे झाले. थोडक्यात या कालावधीत जिल्हयातील केळीच्या लागवडी खालील क्षेत्रफळात वाढ झालेली आढळते. यावरुन केळीचे जिल्हयातील महत्व लक्षात येते.

महाराष्ट्र राज्य व जळगांव जिल्हयातील केळी पिकाचे उत्पादन -

जागतिक केळी उत्पादनात भारत अग्रेसर आहे. भारतातील प्रमुख केळी उत्पादक राज्यामध्ये प्रती हेक्टरी उत्पादकतेत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्याला केळीच्या संदर्भात मानाचे स्थान मिळवून देण्यात जळगांव जिल्हयाचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे केळी उत्पादनाची तुलना महाराष्ट्र राज्याशी करणे संयुक्तिक आहे.

तक्ता क्र. -३

महाराष्ट्र राज्यातील व जळ□ांव जिल्हयातील केळी उत्पादन

(□त्र ‘ ००० ’ टना मध्ये)

अ.क्र.	वर्ष	महाराष्ट्र राज्य	जळगांव जिल्हा
१	१९९५-९६	२२१९.७०	१२२९.४०(५५.४)
२	१९९६-९७	२६९५.०३	१२९७.६०(४८.१)
३	१९९७-९८	३१२९.९०	१४९३.९०(४७.७)
४	१९९८-९९	३४३८.०१	१५००.९२(४३.७)
५	१९९९-००	३६७७.७१	२१७७.५७(५९.२)
६	२०००-०१	३८९१.६३	२३५७.५८(६०.६)
७	२००१-०२	३९२४.००	२२३३.७३(५६.९)
८	२००२-०३	३६०८.००	२१४४.८४(५९.४)

९	२००३-०४	३६३४.७३	२३९०.८४(६५.८)
१०	२००४-०५	३५५७.७४	२१२५.७१ (५९.८)

□षी सांख्यिकी विषयक माहिती महाराष्ट्र राज्य-२००६ भा□-२
(कंसातील आकडे राज्यातील केळी उत्पादनाशी शेकडा प्रमाण दर्शवितात)

□ळीच्या उत्पादनात जळगांव जिल्हा आघाडीवर आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण केळी उत्पादनापैकी १९९५.९६ मध्ये ५५.४ % वाटा एकटया जळगांव जिल्हयाचा होता. १९९५ ते २००५ या काळात केळीच्या उत्पादनात चढ उताराची प्रवृत्ती दिसून येत असली तरी जळगांव जिल्हा केळी उत्पादनात आघाडीवर असल्याचे दिसून येते. २००४.०५ मध्ये राज्याच्या एकूण केळी उतपादनापैकी ५९.०८% वाटा जिल्हयाचा होता. याचाच अर्थ जळगांव जिल्हा केळी पिकाच्या उत्पादनात राज्यात आघाडीवर आहे. यावरुन जळगांव जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेतील केळी पिकाचे स्थान आणि महत्व लक्षात येते.

□ळी पिकाची देशांतर्गत गरज पूर्ण करण्यात जळगांव जिल्हयाचा महत्वाचा वाटा आहे. असे असले तरी जळगांव जिल्हयाचा केळी पिकाच्या निर्यातीतील वाटा मात्र अतिशय नगण्य आहे. जिल्हयातील दर्जेदार केळीच्या निर्यातीला खूप मोठी संधी आहे. त्यासाठी उत्पादन खर्च मर्यादित ठेवून गुणवत्तापूर्ण केळी उत्पादीत करणे आवश्यक आहे.

निर्यातक्षम केळी उत्पादनासाठीच्या उपाययोजना -

१. □ळी पिकाचा उत्पादन खर्च मर्यादित ठेवून जास्तीत जास्त निर्यातक्षम केळी कशी उत्पादीत करता येईल, यावर लक्ष केंद्रीत करणे.
२. ज्या देशात केळीची निर्यात करायाची आहे, त्या देशातील लोकांची आवडनिवड लक्षात घेवून योग्य वाणाची निवड करणे.
३. निर्याती संबंधी आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता करण्यासाठी रासायनिक खते, किटकनाशके यांचा कमीत कमी वापर करुन केळी वरील रसायनांच्या मात्रेचा अंश प्रमाणित मानकांपेक्षा कमी राहील याची काळजी घेणे.
४. □ळी निर्यात केल्या जाणाऱ्या देशातील बाजारपेठांतील विक्री पध्दतींचे अध्ययन करुन आंतरराष्टीय बाजारपेठांतील भारताचा केळी पिकाचा वाटा वाढविण्याचा प्रयत्न करणे.
५. □ळी पिकाच्या निर्यातीसाठी कापणीनंतर हाताळणी, वर्गवारी, विकीरण प्रक्रिया, पॅकेजिंग, शास्त्रोक्त संग्रहणाच्या सुविधा निर्माण □र□यावर भर दे□.
६. □ळीच्या निर्यातीसाठी विपणन व्यवस्था मजबूत करुन आवश्य□ सेवासुविधा निर्मा□ □र□.

निष□र्ष :-

१) □ळी उत्पादनात अग्रक्रमांकावर असलेल्या भारताचा केळीच्या निर्यातीतील वाटा केवळ ०.०८% एवढाच आहे.
२) जागतिक स्तरावर केळी उत्पादनात भारत अग्रस्थानी असून भारतातील केळी उत्पादक राज्यांमध्ये सर्वाधिक क्षेत्रफळावर केळीची लागवड □र□रे तामिळनाडू राज्य प्रथम क्रमांकावर आहे.
३) भारतामध्ये प्रतीहेक्टरी केळी उत्पादनात महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे.
४) महाराष्ट्र राज्यात जळगांव जिल्हा केळीच्या उत्पादनासाठी आणि उत्पादकतेसाठी अग्रेसर आहे.

५) महाराष्ट्रात केळी पिकाखालील क्षेत्र वाढत असले तरी जळगांव जिल्हा वगळता इतर जिल्हयामध्ये केळी पि□खालील क्षेत्रात वाढ झालेली -नाही.

६) जळगांव जिल्हा राज्यात केळीच्या लागवडीसाठी प्रसिध्द असून २००४-०५ मध्ये राज्यातील एकूण केळी पिकाच्या लागवडी खालील क्षेत्रफळापैकी ५९.८% वाटा जळगांव जिल्हयाचा होता.

७) जळगांव जिल्हा केळी उत्पादनात राज्यात आघाडीवर असून २००४-०५ मध्ये राज्यातील एकूण केळी उत्पादनापैकी ५९.७% वाटा एकटया जळगांव जिल्हयाचा होता.

८) जळगांव जिल्हयातील दर्जेदार केळीच्या निर्यातीला भरपूर वाव आहे.

९) □ळी पिक जळगांव जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेचा आर्थिक कणा बनला आहे.

१०) जिल्हयातील केळी उत्पादक शेतकरी नवतंत्रज्ञानाच्या स्विकारात अग्रेसर आहेत.

संदर्भ सूची :-

१) नाफेड अरुणा व्यावसायिक फलोत्पादन कॉनिनेन्टल प्र□ाश-न,पु□.

२) महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी २००९.१०

३) □ृषि सांख्यिकी विषयक माहिती - महाराष्ट्र राज्य २००६, भा□-२.

४) योजना विशेषांक - जानेवारी २०११.

५) ॲग्रोवन - जानेवारी, २००९.

६) □ृषिप□-न मित्र - ऑगष्ट,२०१०.